महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९ee /२०२३ दि. १३/१२/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कळवा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत ठाणे बेलापूर वाहिनीवर बुधाजीनगर कट असून सदर परिसरात शाळा, विदयालय व सरकारी कार्यालये आहेत. त्यामुळे सदर रस्ता नियमित वर्दळीचा आहे. ठाणे कडून नवी मुंबई कडे नोकरदार वर्ग तसेच मोठया प्रमाणात वाहनांची ये–जा होत असते. तसेच सायंकाळी नवी मुंबई कडून येणारी वाहने कळवा नाका येथून खारेगाव कडे न जाता बुधाजीनगर येथे उजवे वळण घेणेकरीता थांबतात. त्यामुळे पाठीमागे वाहनांच्या रांगा लागतात. तसेच ठाणे कडून येणारी बरीचशी वाहने बुधाजीनगर कट येथून यु टर्न घेणेकरीता थांबतात. त्यामुळे सदर ठिकाणी वाहतूक कोंडी होवून वाहनांच्या रांगा नवी मुंबई हद्दीत जातात. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) बेलापूर ठाणे वाहिनीवरील नवी मुंबई कडून उजवे वळण व यु टर्न घेणाऱ्या वाहनांना **बुधाजीनगर कट** येथे सायंकाळी १८:०० ते २१:०० वाजेपावेतो **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने बुधाजीनगर कट येथून सरळ पुढे जावून कळवा नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) ठाणे बेलापूर वाहिनीवरील बुधाजीनगर कट येथे यु टर्न घेणाऱ्या वाहनांना **बुधाजीनगर कट** येथे सायंकाळी १८:०० ते २१:०० वाजेपावेतो **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने विटावा रेल्वे ब्रिज पास करून गणपती पाडा कट यु टर्न घेवून इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना शनिवार, रविवार व सरकारी सुट्टीचे वार वगळून दि. १३ /१२/२०२३ रोजीपासून ०२ महिन्यांकरीता अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर** :–

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/ वि.शा. ठाणे
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, नवी मुंबई

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :—**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
परिवहन व्यवस्थापक, नवी मुंबई महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ ठाणे वाहतूक विभाग व संबंधित वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.

CS CamScanner